अंक १ ला] वर्ष २५ वें]

# "श्री साईलीला"

त्रैमासिक



जानेवारी, फेब्रुवारी, मार्च १९४८.

# श्री साईलीला

श्री साईनाथ प्रसन्न



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदकपार्श्वतो योजनैकम् ।
प्रादूर्भूत्वाऽत्मभूत्या निशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः ॥

वर्ष २५ ] त्रैमासिक—मार्च १९४८ [ अंक १ ला

## संपादकीय

माझे परमप्रिय **संतभक्त बंधु-भगिनी** हो !

भगवंतानें दिलेल्या सर्वोत्तम अशा दुर्मिळ मनुष्य-जन्माची देणगी कांहीं अवर्णनीय आहे.

अनंत योनि भ्रमण करून हा नरदेह आपणांस प्राप्त झाला आहे. ह्या नरदेहाचें सार्थक आपण जर केलें नाहीं तर तो एक परमेश्वराचा मोठा अपराधि होईल. नरतनूच्या सहाय्यानें आपल्या कल्याणाचा फायदा करून घेणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे, आणि तें कर्तव्य म्हटलें म्हणजे जन्म-मरणाच्या व्याधींतून मुक्त होऊन आत्मोद्धार करून घेणें हें होय; आणि तें फक्त **संतसंगाच्या** योगानें पुनर्जन्मबंधन तोडलें जाऊन आत्मज्ञानाच्या मार्गानें हा दुःखरूप संसार-सागर

श्रीरामदास स्वामीनीं कल्याण नामक पुरुषाचा उद्धार केला, श्रीजनार्दन स्वामीनीं एकनाथाचा उद्धार केला. त्याप्रमाणें अनेक अनेक अधिकारी संतांनीं अनेक मनुष्यांचा उद्धार केला आहे.

ह्या कलियुगांत अवतार घेतलेले अनेक सिद्ध पुरुष होऊन गेले. त्यांतीलच श्रीसद्गुरु साईनाथ महाराज (शिरडी) हे विसाव्या शतकाच्या सुरवातीस होऊन गेलेले एक अवतारी सिद्ध पुरुष होते.

जरी श्रीसद्गुरु साइबाबांनीं १९१८ सालीं समाधी घेतली तरी आज आपल्या भक्तांकरतां हांकेसरशीं धांवून येत आहेत. त्यांचें 'साईलीला' मासिक, कीं ज्या मासिकांत आपणांस संतांच्या गोष्टी व अनुभव वाचण्यास मिळतील. तें आतां १९४८ सालापासून आपणांस भेट देत आहे.

हें मासिक कै. रावसाहेब यशवंत जनार्दन गाळवणकर यांच्या संपादकत्वाखालीं चालत असे, परंतु त्यांच्या निधनामुळें तें बंद झालें होतें. तें आज नव्या जोमानें, नव्या उत्साहानें परत आपणांकडे येत आहे.

देव भावाचा भुकेला–आपण या मासिकाला (वर्गणीदार होऊन) भाव (प्रेम) दाखवाल अशी आशा आहे व कांहीं वर्षांच्या गैरहजेरीनंतर चालू होणाऱ्या या मासिकाचा वर्गणीदार होऊन सत्कार करावा व 'साई' वर आपलें प्रेम दाखवावें अशी ह्या संपादकाची आपणा सर्वांस हात जोडून विनंति आहे.

— संपादक

## —: श्री सद्गुरु साईबाबांचीं अकरा वचनें :—

शिरडीस ज्याचे लागतील पाय । टळती अपाय सर्व त्याचे ॥ १ ॥
माझ्या समाधीची पायरी चढेल । दुःख हें हरेल सर्व त्याचें ॥ २ ॥
जरी हें शरीर गेलों मी टाकून । तरी मी धांवेन भक्तांसाठीं ॥ ३ ॥
नवसास माझी पावेल समाधी । धरा दृढ बुद्धी माझ्या ठायीं ॥ ४ ॥
नित्य मी जिवंत, जाणा हेंचि सत्य । नित्य घ्या प्रचीत अनुभवें ॥ ५ ॥
शरण मज आला, आणि वाया गेला । दाखवा दाखला ऐसा कोणी ॥ ६ ॥
जो जो, मज भजे जैशा जैशा भावें; । तैसा तैसा, पावे, मीही त्यांसी ॥ ७ ॥
तुमचा मी भार वाहीन सर्वथा । नव्हे हें अन्यथा वचन माझें ॥ ८ ॥
जाणा येथें आहे साहाय्य सर्वांस । मागे जें जें त्यास तें तें लाभे ॥ ९ ॥
माझा जो जाहला कायावाचा मनीं । तयाचा मी ऋणी सर्वकाळ ॥ १० ॥
साई म्हणे तोचि; तोचि झाला धन्य । झाला जो अनन्य माझ्या पायीं ॥ ११ ॥

# अथ षोडशोपचार देवपूजा

( स्नानादिक आटोपल्यानंतर शुचिर्भूतपणें आसनावर बसून द्विराचमन प्राणायामादिक करून देवपूजेच्या भक्तिपूर्वक संकल्प करावा. )

" श्रीगजानन, श्रीलक्ष्मीनारायण ( अथवा अमुक इष्ट ) देवता प्रीत्यर्थ यथाज्ञानेय यथामिलितोपचारद्रव्यैः षोडशोपचार पूजनमहं करिष्ये " असें म्हणूक उदक सोडावें व देवपूजेस आरंभ करण्यापूर्वी कलशपूजा, शंखपूजा, घंटापूजा व दीपपूजा करावी, ती—

" कलशदेवताभ्योनमः सकलपूजार्थे गंधाक्षत पत्र पुष्पं समर्पयामि,
शंखदेवताभ्योनमः सकलपूजार्थे गंधाक्षत पत्र पुष्पं समर्पयामि,
घंटादेवताभ्योनमः सकल पूजार्थे गंधाक्षत पत्र पुष्पं समर्पयामि,
दीपदेवताभ्योनमः सकलपूजार्थे गंधाक्षत पत्र पुष्पं समर्पयामि, "

असें म्हणून त्या त्या देवतेवर गंधादि वहाणें. ही पूजा झाल्यावर नंतर शंखांतील पाण्यानें सर्व पूजाद्रव्यें व आपलें अंग प्रोक्षावें. त्यावेळीं—" अपवित्र पवित्रो वा सर्ववस्थां गतो ऽपि वा । यः स्मरेत्पुण्डरीकाक्षं सबाह्यान्तरं शुचिः" ॥ हा मंत्र म्हणावा.

नंतर त्या त्या देवतेचें ध्यान श्लोक म्हणून 'ध्यानं' समर्पयामि ( म्हणावें, नंतर हृदयांतील भावनामय दिव्य मूर्तीस पूजेच्या प्रतिमेंत आणून स्थापावें व ) 'आवाहनं' समर्पयामि " शांतोभव, सुप्रसन्नोभव, वरदोभव, अभिमुखोभव, " असें म्हणून मूर्तीवर अक्षता घालाव्या. मग ती प्रतिमा—शीला, काष्ट,मृत्तिका अथवा चित्रमय कसलीही असो—अगदीं जिवंत आहे. प्रत्यक्ष आहे, अशी भावना करून पुढील उपचार मानस व स्थूल समर्पण करावे. ( प्रत्येक उपचारापुढें 'समर्पयामि' असें म्हणावें. ) 'आसनं' स. ( अक्षता वहाव्या. ) 'पाद्यं' स. ( पाणी सोडावें ) 'अर्घ्यं' स. ( पाणी सोडावें ) 'आचमनीय' स. ( पाणी सोडावें ) 'स्नानं' स. ( पंचामृतस्नानं–पय–दधि–घृत–मधु–शर्करास्नानं सम., गंदोदकस्नानं, शुद्धोदकस्नानं स. येथें पुरुषसुक्तादिकाचा हवातर अभिषेक करावा. मूर्ति कागदावरील अथवा मातीची असेल तर फक्त पाण्यानें प्रोक्षण करावें. ) वस्त्रोपवस्त्रं स., ( सुवर्णमौक्तिकरत्नालंकारान् स. ) 'यज्ञोपवीत' स., 'गंध' स., देव्यै हरिद्रा कुंकमं सौभाग्यद्रव्यं स., 'पुष्पं' स., ( तुलसीपत्रं, बिल्व, दूर्वा इ. त्या त्या देवतेचे प्रिय पदार्थ अर्पावे. ) 'धूपं' स., 'दीपं' स., 'नैवेद्यं' स., ( मध्योपानीयं, उत्तरपोषनं, हस्तप्रक्षालनं, मुखप्रक्षालनं, करोद्वर्तनार्थे चंदन ) 'तांबूलं' स., ( सुवर्ण पुष्प दाक्षिणां, महाफलं स. ) 'महानिरांजन दीपं स., ( आरत्या म्हणाव्या ) 'मंत्र पुष्पांजलि' स., ( प्रदक्षिणां नमस्कारान्, छत्रं, चामरं, व्यजनं, दर्पणं, गीतं, नृत्यं, वाद्यं, आंदोलनं, वेदपारायणं, नटनाट्यं, रथगजाश्वपदातीन् स., सर्व राजोपचारार्थे अक्षतान् समर्प. ) १ मुख्य प्राण—सनकादि देवताभ्योनमः पाद्यार्घ्य—आचमन—स्नान—वस्त्रोपवस्त्र—यज्ञोपवीत—गंधपुष्प—तुलसीदल ( निर्माल्य ) धूप—दीप—नैवेद्य—

( शेषनैवेद्य ) स. मध्येपानीयं—उत्तरापोषनं — हस्तप्रक्षालनं — मुखप्रक्षालनं — करोद्वर्तनार्थे चंदनं तांबूलं—सुवर्णपुष्पदक्षिणां—आर्तिक्यं स. सर्व राजोपचारार्थे अक्षतान समर्पयामि.

( पूजेंतील उपचारांचा व मंत्राचा अर्थ न कळल्यामुळें जड भावनेन पूजा होते. अर्थ समजून पूजा केल्यानें योग्य फल प्राप्त होतें. याकरतां देवपूजेंतील उपचारांचे अर्थ खालीं दिले आहेत. )

( १ ) आवाहनः—म्हणजे बोलावणें:—पूजेच्या प्रतिमेंत पूजा ग्रहण करणेंकरतां ये, ये, अशी नम्रपणें देवाची प्रार्थना करणें, ( व तो प्रतिमेंत येऊन बसला अशी भावना करणें. )

( २ ) आसनः—म्हणजे बसण्याची बैठक. ( रत्नखचित सिंहासन कल्पिणें. )

( ३ ) पाद्यः—पाय धुण्यास पाणी देणें.

( ४ ) अर्घ्यः—हातावर पाणी घालून देवाचे हात धुणें.

( ५ ) आचमनः—चूळ भरणेस पाणी देणें.

( ६ ) स्नानः—अंग धुणें, आंघोळ.

( ७ ) वस्त्रोपवस्त्रः—नेसण्याचें व पांघरण्याचें वस्त्र. ( पितांबर. )

( ८ ) यज्ञोपवीतः—जानवें.

( ९ ) गंधः—चंदन ( तिलक व उटी. )

(१०) पुष्पः—नाना प्रकारचीं सुवासिक फुलें.

(११) धूपः—सुवासिक उदबत्त्या, अगरबत्त्या वगैरे जाळणें.

(१२) दीपः—तुपाच्या तीन वाती पेटवून ओवाळणें.

(१३) नैवेद्यः—षड्रसान्नाचें-पंचपक्वान्नाचें जेवण देणें.

(१४) तांबूलः—भोजनोत्तर खाण्यास त्रयोदशगुणी विडा देणें.

(१५) महानिरांजनदीपः—फुलवाती, कापूर वगैरे ओवाळणें.

(१६) मंत्र पुष्पांजलिः—ओंजळींत फुलें घेऊन अभिमंत्रित करून वाहणें.

हे षोडश ( सोळा ) उपचार ' मुख्य ' उपचार समजावेत. ( कंसांतील उपचार हे गौण उपचार समजावे. त्यांचा अर्थ साधारणतः समजण्यासारखा असल्यामुळें दिला नाहीं. ) याप्रमाणें देवाधिदेवाची-इष्ट-उपास्याची कल्याणेच्छु पुरुषानें नित्य पूजा करावी. स्थूल प्रतिमेची पूजा अथवा हृदयस्थ प्रतिमेची मानसपूजा करतांना राजाधिराजालाही दुर्मिळ असे दिव्य श्रीमंती आचार मनानें कल्पून मोठ्या प्रेमादरानें व भक्तिभावानें देवास अर्पण करावेत. यायोगें आपलें उपास्य दैवत सुप्रसन्न होऊन सर्वार्थी कृपा करील.

अथ भगवत्प्रार्थना ( फार सावकाश व मनोभावानें करावी ) ' काले वर्षतु पर्जन्यः पृथिवी सस्यशालिनी । देशोऽयं क्षोभरहितो ब्राह्मणाः सन्तु निर्भयाः ॥ १ ॥ अपुत्राः पुत्रिणः सन्तु पुत्रिणः सन्तु पौत्रिणः । अधनाः सधनाः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः सर्वे सन्तु निरामयाः ॥ २ ॥

"आकल्प आयुष्य व्हावें तया कुळा." इ. प्राकृत अभंगवाणीनें व गद्यवाणीनेंही प्रार्थना करावी. आणखी आपल्या मनांत जी इच्छा असेल ती मागून घ्यावी, मुख्यतः भक्तिप्रेमसुख मागावें.

"यस्यस्मृत्याच नामोक्त्या तपः पूजाक्रियादिषु । न्यूनं संपूर्णतां यातु सद्यो वंदे तमच्युतं ॥ मंत्रहीनं क्रियाहीनं भक्तिहीनं जनार्दन ॥ यत्कृतंतु मयादेव परिपूर्णं तदस्तुमे ॥" अनेन यथा ज्ञानेन यथामिलितोपचारद्रव्यैः पूजनेन भगवान् तेन श्रीमहाविष्णुः (इष्टदेवता) प्रीयताम्, प्रीतोभवतु तत्सत् श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ असें म्हणून पाणी सोडून नम्रतापूर्वक भक्तिप्रेमानें नमस्कार करावा. व प्रतिमेंतील चैतन्यमूर्ति पुन्हा आपल्या हृदयमंदिरांत आणून स्थापावी व तिचें शक्य तितक्या वेळ ध्यान करावें. याप्रमाणें भक्तिभावानें पूजा करणारावर भगवंत प्रसन्न होऊन त्याचे सर्व मनोरथ पूर्ण करतो हा दृढ विश्वास अंतःकरणांत सदैव बाळगावा नंतर आपल्या इष्टदेवतेच्या आरत्या म्हणाव्या.

आरत्या संपल्यानंतरः—

घालीन लोटांगण, वंदीन चरण । डोळ्यांनी पाहीन रुप तुझें ॥ १ ॥ (इत्यादी)

नंतर :—

## अथ मंत्रपुष्पं

ॐ राजाधिराजाय प्रसह्यसाहिने । नमो वयं वैश्रवणाय कुर्महे । स मे कामान्कामकामाय मह्यं । कामेश्वरो वैश्रवणो ददातु । कुबेराज वैश्रवणाय महाराजाय नमः । ॐ स्वति । साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं महाराज्य—माधिपत्यमयं संमतपर्या ईस्यात् सार्वभौमः सार्वायुषांतादापरार्धात् । पृथिव्यै समुद्रपर्यंताया एकराळिति । तदप्येषश्लोको भिगितो 'मरुतः परिवेष्टारो मरुत्तस्यावसनगृहे ॥ अविक्षितस्य काम प्रेर्विश्वेदेवाः सभासद' ॥ इति ॥ महामंत्र पुष्पांजलिं समर्पयामि ॥

---

# संतांच्या संगतींत

या कलीयुगांत नरदेहाचें सार्थक करून घेण्याचा उपाय म्हणजे संतांच्या संगतींत अखंड वास करणें हा होय. ज्याप्रमाणें जशी संगत त्याप्रमाणें नरदेहाला वळण लागत असतें. नदी जशी जशी वळवावी तशी तशी वळते आणि सागराला मिळते. नदी स्वतः ज्या ज्या भागांतून जाते त्या त्या भागांना आपल्याकडील उत्तमांतले उत्तम गुण देऊन त्यांचे अंगीं असलेले दोष धुऊन काढते व त्या भागांना सुपीक करते त्याप्रमाणें हे संत निष्कामदृष्टीनें सर्व मानवजातीला शुद्ध करतात.

संसाररूपी भवसागर तरून जाण्याला ह्या कलीयुगांत एकच साधन आहे तें म्हणजे संत सहवास. "दुखान्ती सुख व सुखान्ती दुःख, खऱ्या अंतीं खोटें व खोट्या

अंतीं खरें " अशा तऱ्हेच्या आपल्या संसारांत वेळोवेळीं लागणारे खांचखळगे भरून काढण्याला कोणाची तरी मदत घेणें प्राप्त होतें; तशी मदत संतरूपी मायबापांच्या संगतींत मिळत असते.

सत्संग, संतसेवा आणि संतकृपा ह्या अवस्था पायरी पायरीनींच मिळवून आत्मोद्धाराचा मार्ग मिळतो. ८४ लक्ष योनी भ्रमण करून हा नरदेह प्राप्त झाला आहे. तो केवळ आपली इस्टेट, दागदागिना, मुलेंबाळें, पैसा अडका, शेतीभाती वगैरे वगैरे मायारूप पदार्थ जोडण्याकरतांच अल्लामियानें दिलेला नाहीं, तर मी आलों कोठून, माझें कर्तव्य काय आणि मी जाणार कोठें ह्याचा शोध करण्याकरतांच प्राप्त झाला आहे. तो शोध आपणांस संतांच्या सहवासांतच मिळेल.

मनुष्य उपजतच स्वयंसिद्ध आहे, परंतु अज्ञानरूपी रावणानें आपल्या मायेच्या मगरमिठींत पकडल्याकारणानें, आपला स्वतः स्वयंसिद्धपणा गमाऊन बसला आहे. ' तुझें आहे तुजपाशीं परीं तूं जागा चुकलाशी ' ह्या तुकोबाच्या अभंगाच्या आधारें सिद्ध होत आहे. रामजन्म जवळच येत आहे. दरवर्षी रामजन्म येतो आणि जातो. उत्सव होतात आणि करतात. परंतु साध्वी मुक्ताबाईच्या म्हणण्याप्रमाणें मनुष्य कोरडा तो कोरडाच ! रामजन्म म्हणजे स्वयंसिद्ध–असलेला आत्मरूपी जो रामदीप, त्याला प्रगट करून अंतःकरणपूर्वक तेवत ठेवणें हाच खरा रामजन्माचा उद्देश आहे.

माळावरील जैसें मृगजळ । शुक्तिकाधिष्टित रौप्य झळाळ ॥
पाहतां दोरीचें वेटाळ । नसता व्याळ आभासे ॥ १३ ॥
दोरीवरी सर्पारोपण । वस्तुगत्या अप्रमाण ॥
तैसेंच ' मी देह ' हा अभिमान । मिथ्याबंधन मुक्तासी ॥ १४ ॥
देहेंद्रिय मनःप्राण । आत्मा याहूनही विलक्षण ॥
स्वयंज्योति शुद्ध चैतन्य । विकार विहीन निराकृती ॥ १५ ॥

[ दाभोळकरकृत साईचरित्र अध्याय १९ वा ]

" राम " या शब्दांत ' रा ' म्हटल्याबरोबर नरदेहरूपी किल्ल्याचा दरवाजा उघडला जाऊन पापमय सर्व भूतें बाहेर जातात व तीं परत फिरून न येण्यासाठीं ' म ' म्हटला जातो. अशा या राम शब्दाच्या उच्चारानें रावणरुपी राक्षस मारून नरदेहरूपी किल्ल्याला आपोआप शुद्धता येते. परंतु हें सर्व संतांच्या संगतींत राहूनच प्राप्त होईल. संत रामदास, साध्वी जनाबाई, साध्वी मिराबाई, संत चांगाचोखा व आधुनिक काळांतील संत सद्‌गुरु साईनाथ महाराज यांचीं चरित्रें अवलोकन केलीं असतां हें दिसून येईल.

एखादा धनाढ्य, कोट्याधिश, श्रीमंत अगर एखादा राजा यांचीं नांवें ते जिवंत

असेपर्यंतच ऐकूं येतात. पण त्यांच्या पश्चात् त्यांची आठवणही कोणास होत नाहीं परंतु संतांचीं नांवें, वचनें, अभंग व चरित्रें त्यांच्या पश्चात् असंख्य वर्षें अव्याहत आपणांस ऐकूं येतात व तींच मानवप्राण्यास संसाररुपी सागर तरून जाण्यास उपयोगी पडतात.

काय सांगूं आंतां संतांचे उपकार!
मज निरंतर जागविती ॥

संतांचे उपकार जन्मोजन्मांतरीं फिटणें कठीण आहे. संत स्वतःच्या देहास प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष क्षणोक्षणी दुसऱ्याचें कल्याण व हित साधण्याकरितां त्रास करून घेतात. बाहेरून जरी त्यांनीं उग्ररूप धारण केलें असलें तरी अंतरांत त्यांच्या सदैव दया-क्षमा-शांती नांदत असते. प्रत्यक्ष मृत्यु न्यावयास आला असला तरी त्यास पिटाळून लावून त्याच्या दाढेंतून एखाद्या मनुष्यप्राण्यास सोडवून आणण्याची शक्ती त्यांच्यांत सदैव वास करीत असते.

या कलीयुगांत कृपाळू, कनवाळू, दयाळू मायबाप केवळ एक संतच होत. त्यांस राव, रंक समान असतात. संतांचे अवतार मुलेंबाळें, विपुल लक्ष्मी व नानाप्रकारचे विषयोपभोग प्राप्त करून देण्याकरतां आलेले नसतात. तर या क्षणिक विषयानंदांत अखंड बुडून जात असलेल्या मानवी प्राण्यावर आपल्या कृपेची पूर्ण छाया करून नर-जन्माचें सार्थक करून देण्याकरतांच आलेले असतात म्हणून मनाच्या संकल्प-विकल्पाला हद्दपार करून अनन्य भावें संतास भजावें.

संतसंघ जेवढा आनंददायक आहे तेवढाच तो बिकट आहे:—

'संतसंगतीं न करावा वास । एखादे गुणदोष अंगा येती ॥
मग तया दोषा नाहीं परिहार । होय अपहार सुकृताचा ॥
तुका म्हणे नमस्कारावें दूरून । अंतरीं धरून राहे रुप ॥

प्रापंचिक मनुष्याला संतांच्या संगतींत राहणें अत्यंत अवघड आहे, कारण त्यांच्या-बद्दलचे कांहींतरी गुणदोष मनांत आल्यावांचून राहणार नाहींत. संत हे सर्वकाळ अद्वयानंदांत निमग्न असतात. त्यांच्या ठिकाणीं भेद-बुद्धीचा लेश नसतो. याकरतां भावना अढळ होईपर्यंत त्यांचें स्वरूप अंतरांत घेऊन रहा, आणि दुरूनच नमस्कार करा. जवळ जाऊं नका अशी तुकोबांनीं प्रापंचिक मनुष्यास सूचना दिली आहे.

संतांच्याबद्दल विकल्पास जागा न देतां शुद्ध भावना धरली तर मानवप्राण्याचा जितका फायदा ( पुण्य ) होईल तितकाच त्यांच्या ठिकाणीं द्वेषभावना ठेवून वागलें असतां अपाय( पाप ) होईल. संतनिंदा करून 'अपुला आपण वैरी' होण्यापेक्षां त्यांच्या वाटेस न जातां आपला संसार थाटामाटानें व ऐषआरामानें खुशाल करावा. संतांच्या संगतींत मानवप्राण्याला पुष्कळसे फायदे करून घेतां येतील. कलियुगांत संतासारखे मार्गदर्शक कोणी नाहींत, म्हणून आपण जितका संतसमागम होईल तितका करावा.

संतांचा जीवनक्रम म्हणजेचः—

परी 'मी बंदा अल्लाचिया पदरीं । स्वयें ये-परी वदत ते ॥ ४ ॥
कधीं कोणाची बरोबरी । करी न करावी कवण्याहीपरी ॥
पाहीं जो विश्वंभर चराचरीं । तयासी हारींच साजिरी ॥ ६ ॥
न करी कोणाची अवगणना । कोणासही तुच्छ लेखीना ॥
भूतमात्रीं नारायणा । चैतन्यघना पाहीं तो ॥ ७ ॥
कधिं न म्हणवीत 'अनलहक्क' । मी एक परमेश्वराचा पाईक ॥
गरीब मी 'यादेहक्क' । 'अल्लामालिक' जपनित्य ॥ ८ ॥

अर्थ— अनलः—मीच परमेश्वर. यादेहकः—मी परमेश्वराचा यादगार आहें.

[श्री दाभोळकरकृत श्रीसाईचरित्र अध्याय २३ वा]

प्रिय वाचक बंधु-भगिनी हो—

माझ्या लिहिण्यांत सहज ओघामुळें सीमेपलिकडे बोलणें झालेसें वाटल्यास माझी चूक सदय अंतःकरणानें पदरांत घेऊन मला क्षमा करा. एवढीच विनंति.

डॉ. के. भ. गव्हाणकर.

---

# इषारा

शिर्डी क्षेत्र म्हणून प्रसिद्धीस येण्याचें कारण 'आधुनिक' संतचूडामणी श्रीसमर्थ साईबाबा' यांचा तेथील चिरकाल वास होय.

शिरडीला साईबाबांशिवाय कोणीहि संत नाहीं. शिरडी म्हणजेच साईबाबा व साईबाबा म्हणजेच शिरडी.' श्रीसाईबाबांनीं कोणासहि मंत्र दिला नाहीं व आपल्या पश्चात् आपली गादी चालवण्याकरतां शिष्यपदही दिलेलें नाहीं. ते स्वतः स्वयंसिद्ध होते व आहेत. याची साक्ष त्यांचेच बोल देतातः— [श्री. दाभोळकरकृत साईचरित्र अध्याय २५ वा.]

असो ही तों बाबांची वैखरी । बाबा असतां देहधारी ।
परी पुढेंहि देहत्यागानंतरी । स्वयें निर्धारी निजमहिमा ॥ १०४ ॥
"झालों जरी गतप्राण । वाक्य माझें मानाप्रमाण ।
माझीं हाडें तुर्बतीमधून । देतील आश्वासन तुम्हांस ॥ १०५ ॥

मी काय पण माझी तुर्बत । राहील तुम्हांसवें बोलत ।
जो तीस अनन्य शरणांगत । राहील डोलत तयासवें ॥ १०६ ॥
डोळ्याआड होईन ही चिंता । करुं नका तुम्हीं मजकरितां ॥
माझीं हाडें ऐकाल बोलतां । हितगुज करितां तुम्हांसवें ॥ १०७ ॥
मात्र माझें करा स्मरण । विश्वासयुक्त अंतःकरण ।
ठेवा करा निष्काम भजन । कृतकल्याण पावाल ' ॥ १०८ ॥

वरील अध्यायांवरून पंढरींतल्या विठोबाला, नाशिकांतल्या रामाला बडव्यांची व काशीविश्वेश्वराला पंड्यांची मध्यस्थी लागते तशी शिर्डीतील श्रीसाईला कोणाची बडवेगिरी अगर पंडेगिरी लागत नाहीं व ती त्यांना खपणार नाहीं. ताकाला जाऊन गाडगं लपविण्याची पद्धत आम्हां मानवजातीला जी लागली आहे ती समूळ नाश पावली पाहिजे व स्वतःचें गाऱ्हाणें वेडेवांकडें कां होईना स्वतःच साईच्या कानावर ( समाधीस ) घालणें फार श्रेयस्कर झालें पाहिजे.

शिर्डी-संस्थान कमिटी होतांहोईतों शिर्डी-संस्थानमध्यें प्रत्येक भक्ताची सोय लावीत असतें त्याचा पुरेपूर फायदा प्रत्येक भक्तगणानें घ्यावा. शिर्डी संस्थानांत हुद्यावर असलेले मॅनेजर अगर भोजनगृह व्यवस्थापक यांच्या व्यतिरिक्त श्री सद्‌गुरु साईबाबा विषयींच्या भूलथापांना आपण बळी पडूं नका.

कै. ता. ग. पाटील यांची मातोश्री कै. बायजाबाई, कीं ज्या बाईनें बाबांच्या पाठीमागें रानावनांत भर उन्हांत जाऊन त्यांना भाकरी खाऊं घातली आहे, त्यांचें घर शिरडींत आहे. त्यांचे चि. बाजीराव पाटील हे हल्लीं संस्थान कमिटीचे एक विश्वस्थ आहेत, त्यांच्याकडे खरी खरी श्री सद्‌गुरु साईबाबांची हकिगत विचारल्यास आपणांस मिळूं शकेल.

राजाच्या सिंहासनावर राजाशिवाय दुसऱ्या कोणासही बसण्याचा अधिकार नाहीं, देवळांत देवाशिवाय देवाच्या समोर कोणीहि साधूसंत स्वतःच्या पांया दुसऱ्याकडून पडवून घेत नाहींत कारण खरे साधू अगर संत तो देवाचा फार मोठा अपमान समजतात. त्यांना देव हाच मोठा वाटतो, व ते दुसऱ्यांसहि देवळांतील देवाच्याच पांया पडा असें विनवीत असतात. मग शिरडीमध्यें साईबाबांच्या मंदिरांत समाधीवर चावडींत आणि मशिदींत प्रत्यक्ष श्रीसाईनाथांच्या समोर आपली थोरवी व मोठेपणाची जाहिरात लावण्याकरतां दुसऱ्याकडून-शिष्य अगर इतर कोणीहि, आपल्या स्वतःच्या पांया पडवून घेतात हे किती लज्जास्पद आहे ! तरी भक्तगणांनीं शिरडींत साईबाबा हाच देव असल्यानें द्वैतभाव विसरून जाऊन श्री सद्‌गुरु साईबाबाच, प्रत्यक्ष समोर आहेत असें कल्पून त्या त्या स्थानांच्या ठिकाणीं नमस्कार करणें फार पुण्यदायक होईल.

श्री सद्‌गुरु साईनाथांच्या प्रेरणेनेंच हा इषारा लिहीला आहे. ' आपुलिया बळें नाहीं बोलवत । सखा पांडुरंग वाचा त्याची ॥

—संपादक.

## अनुभव

श्री. संपादक महाशय—साईलीला यास स. न. वि. वि.

मी १९४३ सालच्या पुण्यतिथीच्या उत्सवास कुर्ल्यास सन्माननीय डॉ. केशवराव भगवंत गव्हाणकर यांच्या घरीं माझ्या एका मित्राबरोबर गेलों होतों. तत्पूर्वी मला साईबाबा कोण कुठचे हें कांहींच माहीत नव्हतें. तेथेंच श्री साईबाबांची ओळख झाली. व हळूहळू माझें मन साईबाबांकडे ओढ घेऊं लागलें व आश्चर्याची गोष्ट अशी कीं, मी जास्त शिकलेला नसतांही व माझ्याजवळ जन्मतः कवित्वाचा अभाव असतांही बाबांच्याच कृपेनें मी खालील कविता केल्या आहेत.

द. पां. फडके

बाबांचा दरबार । भरला । बाबांचा दरबार ॥
एकादशीचा रवि उगवला । बाबानीं तो देह ठेविला ॥
आत्म्याचा संचार राहिला । नामाचा आधार ॥ धृ ॥
भक्तमंडळी गाऊं लागली । टाळ-मृदंगें साथच दीधली ।
प्रेमभरानें दंग जाहली । भक्तिचा संसार ॥ १ ॥
बालक विनवीत बाबा तुम्हीं । दर्शन कधीं देणार ।
सेवा अमुची अपुरी दिसते । पुरीच ती कधीं करणार ॥ २ ॥
एकादशीचा चंद्र उगवला । भिडला क्षीतिजापार ।
बाबांच्या नामाचा करुं या । आपण जयजयकार ॥ ३ ॥

---

सच कहेता एक दीवाणा मेरे गुरुका नाम है ।
मेरे गुरुका नाम । शिरडी उनोका धाम ।
और साई उनका नाम होकर । मशिदमे ठीकाणा है ॥ धृ ॥
मेरे गुरुने ना बताई । किसीको अपनी जात ।
दुनियेमे परमात्मा है ए सच् बतायी एकी बात ॥ १ ॥
एक दिन शिरडी क्षेत्रमे । नही दिया किसीने उनको तेल ।
पाणी डालकर बत्ती जलाया । मेरे गुरुका खेल है ॥ २ ॥
सुनो मेरे दिलका कहना । सबसे बडा भगवान का नाम ।
उनकी याद करनेसे । दीलका हो जायेगा काम ॥ ३ ॥

सोना और चांदीका ख्याल । मत करो तुम तो नवजवान ।
जिंदगी खतम् होने पर भी । नही आयेगा साथी साथ ॥ ४ ॥
जो लिया होगा भगवानका नाम । वही आयेगा तुमारे काम ।
आगलके दुनियेमें आपको । बडा मिलेगा मानीमान ॥ ५ ॥

---

रत्नागिरी ३१-१२-४७

रा. रा. संपादक महाशय, साईलीला मासिक यांस,

मी मूळचा रत्नागिरी जिल्ह्यांतला राहणारा-मी एका असाध्य व्याधीनें आजारी होतों ( Skin Leprosy ) रत्नागिरीमधील सर्व डॉक्टर थकले म्हणून मी मुंबईस आलों. तेथील नामांकित डॉक्टरांनींसुद्धां हा रोग बरा होणार नाहीं असें सांगितल्यामुळें मी हताश झालों. परंतु कुर्ल्यास डॉ. गव्हाणकर यांजकडे गेलों असतां त्यांनीं तूं साईबाबांच्या कृपेनें बरा होशील असें सांगितलें व मला बाबांचें चरित्र वाचण्यास दिलें. मी शिर्डी मुक्कामीं जाऊन बाबांचें दर्शन घेतलें व तीर्थ प्राशन करून अंगारा उदी घेऊन आलों. आतां मी बाबांच्या कृपेनें पूर्ण बरा झालों आहे. पूर्वीच्या डॉक्टरांस माझी प्रकृति दाखविली असतां 'तुला कांहीं झालें नाहीं' असा निर्णय त्यांनीं दिला आहे. केवढी ही बाबांची अगाध शक्ती ?

'क्ष'

हा माझा अनुभव 'क्ष' या टोपण नांवाखालीं प्रसिद्ध करावा अशी विनंति आहे.

श्री. संपादक महाशन-साईलीला यांसः—

सा. न. वि. वि.

आपल्या साईलीला मालेंत खालील मजकुरास स्थान द्याल अशी आशा करतों.

मी मागें घटसर्पानें आजारी होतों पण श्रीसाईबाबांच्या अंगाऱ्यानें मी साफ बरा झालों. आषाढ पौर्णिमा सन १९४७ इ.

आपला कृपाभिलाषि,

**लक्ष्मण तुळशीराम बोंबले**

राहणारः-येताळें

ता० खेड, जि० पुणें.

चित्रकार श्रीयुत मधुसूदन धोंडुजी कांबळी, मुंबई यांजकडून मी तारीख २७-१२-४७ रोजीं शिर्डी संस्थान कमिटीच्या सभेस हजर राहण्याकरितां शिर्डीस गेलों होतों. कांहीं कारणामुळें सभा झाली नाहीं. त्यामुळें आमच्या कमिटींतील कांहीं मंडळी त्याच दिवशीं संध्याकाळीं आपआपल्या मुक्कामी परत गेली. आम्हीं कांहीं मंडळी मागें राहिलों. मी व

माझे गुरुबंधु श्री. गोविंदराव वाड यांनी दुसरे दिवशीं पहाटे ४ वाजतां बैलगाडीनें निघावयाचें ठरविलें. व त्याप्रमाणें दुसरे दिवशीं पहाटे ४ वाजतां उठून प्रातःविधी आटोपून समाधीचें व द्वारकामाईचें दर्शन घेऊन नंतर श्री समर्थ बाबांच्या गुरुपादुकांचे दर्शन घेतलें व आम्हीं बैलगाडींत बसलों. मला मुंबईस जाण्याकरितां नागपूर एक्सप्रेस गांठावयाची होती व श्री. वाड यांना भुसावळला जाण्याकरतां त्याचवेळीं गाडी होती. म्हणून आम्ही ही सारी धडपड करीत होतों. सकाळीं ७ सातचे मुमारास आम्हीं कोपरगांवास येऊन पोहोंचलों. तेथें थोड्या वेळानें आम्हांला कोपरगांव ते मनमाड मोटार सर्व्हिस मिळाली. ती मोटार येवला येथें बराच वेळ थांबल्यामुळें आम्हांस गाड्या मिळतात कीं नाहीं याची धास्ती वाटूं लागली. जर नागपूर एक्सप्रेस चुकली तर मागाहून येणाऱ्या पॅसेंजरनें चांगलीच रखडपट्टी होईल म्हणून मी बाबांचे नामस्मरण करीत एकदांचें मनमाड गांठलें. मोटारमधून उतरून सामानाची व्यवस्था श्री. वाड यांना करावयास सांगून मी स्टेशनवर धांव ठोकली. गाडी दोन मिनिटापूर्वीं स्टेशनमध्यें येऊन उभी होती. बुकिंग ऑफिसजवळ जाऊन पहातों तों तिकिटांकीरतां लांबच्या लांब रांगा लागल्या होत्या त्यामुळें माझी आशाच खुंटली. वेळ तर फारच थोडा होता. अशा परिस्थितींत तेथें तिकीट कलेक्टरमध्यें असलेले श्री साईभक्त श्री. अनंतराव दुखंडे यांची मला आठवण झाली. लगेच मी त्यांच्याकडे धांव घेतली. ते नुकताच आपला जेवणाचा डबा उघडून जेवावयास बसले होते. मी त्यांना माझी परिस्थिति निवेदन केली. त्यांनीं लागलीच अर्ध्या जेवणावरून उठून हात धुवून तसेच ते बुकींग ऑफिसमध्यें गेलें व मला तिकीट काढून दिलें. तिकीट मिळाल्याचा आनंद मानून मी सामानाची व्यवस्था काय आहे ते पाहण्याकरितां जातों तो श्री. वाड यांनीं एका हेलकऱ्यासोबत सामान पाठवून गाडींत ठेवून घेतलें होतें. इतक्यांत गाडीची शिट्टी झाली.

मी त्यांचा निरोप घेऊन गाडींत बसलों व मुंबईस सायंकाळीं ५ वाजतां घरीं येऊन पोंचलों. आंघोळ वगैरे करून सर्वांना शिर्डीहून आणलेला प्रसाद उदी वगैरे दिली व बाहेर सर्वांस देण्यास सांगितलें. नंतर थोड्या वेळानें खिशांतील पाकीट काढून श्री. रा. रा. घाटे यांनीं प्रेसचे बिल श्री. नागेशराव सावंत यांच्याकडे देण्याकरितां दिलेले होते ते पाहूं लागलों. जमाखर्च पाहतांच पांच पांचच्या आठ नोटा नाहींत असें आढळून आलें. तेव्हां मी माझ्या कुटुंबास सांगितले कीं, माझे चाळीस रुपये कुठें तरी हरवले ते मला आठवत नाहीं. असो, बाबांची इच्छा असें म्हणून मी गप्प बसलों, व दुसऱ्या दिवशीं सकाळीं संस्थानचे एक ट्रस्टी श्री. नागेश मा. सावंत यांच्याकडे गेलों व त्यांस शिर्डीस घडलेला सर्व मजकूर सांगितला. व माझे पैसे गेल्याचेंहि सांगितलें. तेव्हां ते म्हणाले कीं, आपण शिरडीस पत्र पाठवून चौकशी करूं व तुम्हीही मॅनेजरना पत्र पाठवून चौकशी करण्यास सांगा. मी त्यांना म्हटलें कीं आतां चौकशी करण्यांत काय अर्थ आहे ? कारण तेथें धांदलींत कुठें हरवले असतील कुणास ठाऊक ? नंतर श्री. घाटे यांनीं दिलेल्या प्रेसच्या बिलाची रक्कम व पत्र त्यांच्याजवळ दिलें व घरीं

आलों. त्यावेळीं अशी आठवण झाली कीं, मी शिर्डीहून निघतें वेळीं त्या नोटा कनवटीस लावून ठेवल्या होत्या. बाबांच्या गुरुपादुकांचें दर्शन घेऊन बैलगाडींत बसतांना मी माझे नेसनाचा शेव व्यवस्थित खोवला होता. त्यावेळीं ते पैसे कोठें पडले याची जाणीव देखील नव्हती. पुढें चार सहा दिवसांनीं श्री. नागेशराव यांच्याकडे गेलों असतां माझे पैसे आम्ही ज्या दिवशीं निघालों त्याच दिवशीं सकाळीं ९ वाजतां शिरडींतील गुरुपादुकांच्या समोरच्या रस्त्यावर बाबांच्या सेवेकरितां राहिलेले श्री. निमकर यांना मिळाले. त्यांनीं ते पैसे श्री. दादा पुरंदरे ( ट्रस्टी ) शि. सं. कमिटी यांजकडे दिले व ते माझेच असे श्री. नागेशराव सावंत यांच्या पत्रावरून समजल्यावर श्री. वैद्य ( खजिनदार ) ते पैसे मला परत मुंबईस पाठविले. केवढीहि बाबांची आगाध लीला !

---

## " श्रीसाईनाथ प्रसन्न "

माझ्या यजमानांनीं, आमच्या चावीच्या कपाटांतील खणांत शंभर रुपयांच्या तीन नोटा ठेवलेल्या होत्या. ता. १ नोव्हेंबर रोजीं माझी मुलगी चि. मालिनी हीला गाडींत जवळ जवळ ७० रु. किंमतीच्या कपड्याचें पार्सल सांपडलें आणि त्याच दिवशीं खणांतील तीन नोटांपैकीं एक नोट नाहींशी झाली असल्याचें माझ्या यजमानांना आढळलें. त्यांना विचार पडला कीं, मालिनीस कपडयाचें पार्सल खरोखरच गाडींत सांपडलें असावें कीं तो कपडा तिनें विकत आणला आहे ? व त्यांनीं, " मालिनीनें कपडा विकत आणला कीं खरोखरच गाडींत सांपडला ? " असें एक दोन वेळां मोघम बोलून दाखविलें. परंतु ह्या बोलण्याचा आम्हांला कोणालाच उलगडा झाला नाहीं. कारण नोट नाहींशी झाल्याचें आमच्या ध्यानीमनींच नव्हतें. नंतर नोव्हेंबरच्या १६ तारखेस माझे यजमान मला म्हणाले, " ह्या खणांत तुझ्या तीन नोटा होत्या, त्यांतील एक नोट तूं दिवाळींत कांहीं खरेदीकरितां घेतलीस का ? हें ऐकताच मला धक्का बसला व फार वाईट वाटलें. कारण त्या खणांत नोटा असल्याचें मला मुळींच ठाऊक नव्हतें. चावीच्या बंद कपाटांतील नोट नाहींशी झाली. कपाट मी व माझे यजमान, ह्यांच्याखेरीज दुसरें कोणीच उघडत नसे. म्हणजे हा माझ्यावर एक प्रकारचा आळच आला, ह्या विचारानें मला चैन पडेना. मालिनी तर सांगूं लागली कीं मला नोटेबद्दल कांहींच ठाऊक नाहीं. कपड्याचें पार्सल मला खरोखरच गाडींत सांपडलें आहे. तीन चार दिवस आम्हीं दोघीही सारख्या बाबांची विनवणी करीत होतों. नंतर २० तारखेस सकाळीं मी देवाची पूजा करून " स्तवनमंजरी " अगदीं अश्रू गाळून वाचली व नंतर बाबांच्या फोटोला नमस्कार करून म्हणालें. " हरवलेली नोट आम्हीं दोघींनींहि पाहिली नाहीं व ती कशी नाहींशीं झाली हेंही आम्हांला ठाऊक नाहीं. तेव्हां माझ्या यजमानांनीं स्वतःच

खर्चाकरितां ती नोट घाईत काढली असेल व त्यांना आठवण नसेल तर ती आठवण करून द्या. नाहीं तर कोणी घेतली असेल त्याचें नांव उघडकीस आणा. मी रोज भक्तिभावानें " स्तवनमंजरी " वाचतें त्याबद्दल तुम्ही हेंच कौतुक दाखविलें कां ? ह्या गोष्टीचा आठ दिवसांच्या आंत उलगडा करून द्या. " अशा रीतीनें तोहि दिवस चिंतेंत गेला. संध्याकाळीं ५--३० च्या सुमारास मी ओट्यावर ह्याच विचारांत बसलें असतां नेहमींचा माळी आबा टाकूर ह्यानें नेहमींप्रमाणें हाराच्या तीन पुड्या आणून दिल्या. त्या दिवशीं गुरुवार होता. माझी मनःस्थिती बरोबर नसल्यामुळें मी त्या हाराच्या पुड्या खिडकींतूनच देवघरांत टाकल्या आणि मी परत ओट्यावर येऊन बसलें. व मनांत विचार केला कीं, ह्या गोष्टीचा ८ दिवसांच्या आंत उलगडा झाला तर मी शिर्डीस पेटींत २५ रु. टाकीन. नंतर सात वाजण्याच्या सुमारास मी माझा मुलगा ( वय १५ ) सूर्यकांत उर्फ साईनाथ ह्यास देवांना हार घालण्यास सांगितलें. परंतु तो माझा धाकटा मुलगा चंद्रकांत ह्याचे हार घालण्याच्या व आरती करण्याच्या पाळीबद्दल भांडण लागलें. तेव्हां मी मोठ्या मुलाला सांगितलें, " तूं घाल देवांना हार. देवाच्या कामास कंटाळा करूं नये. मग देव जास्तच कसोटी पाहतो. मग त्यानें हाराच्या पुड्या सोडायला घेतल्या. दोन हारांच्या पुडया सोडून त्यांतील दोन हार बाजूला ठेवले व तिसरी पुडी उघडून हार उचलला, तों त्याखालीं १०० रुपयांची नोट असल्याचें त्याला आढळलें. त्याबरोबर तो माझ्याकडे धांवत आला व म्हणाला, आई, हाराच्या पुडींत शंभराची नोट ! आणि योगायोग असा कीं त्याच वेळीं माझे यजमान हॉलमध्यें बाबांच्या फोटोसमोर " स्तवनमंजिरी " वाचीत होते. सांपडलेली नोट जी हरवली होती ती ही नाहीं. कारण त्या तीनहि नोटा कोऱ्या करकरीत होत्या व ही नोट तर जुनी दिसते. म्हणजे बंद कपाटांतून नोट नाहींशी झाली व त्याऐवजीं दुसरीच नोट हाराच्या पुडींत सांपडली. हा काय बाबांचा चमत्कार !" असे उद्‌गार त्यांनीं काढले. अशा रीतीनें बाबांनीं माझ्यावरील आळ दूर करून माझी लाज राखली. ही नोट देव्हाऱ्यामध्यें फ्रेममध्यें बसवून पूजेकरितां ठेंवली आहे.

ही गोष्ट घडल्यानंतर शिर्डीस जाऊन बाबांचे पाय धरावे अशी माझ्या मनाला ओढ लागली. परंतु यजमान म्हणूं लागले, " हीच आपली शिर्डी. रोज बाबांच्या फोटोचें दर्शन घेतेस ना ? " पण माझ्या मनाला शिर्डीस जाण्याची विलक्षण ओढ लागली होती. नंतर डिसेंबरच्या १९–२० तारखेस त्यांनीं स्वतःच शिर्डीस जाण्याचा बेत केला. व आम्हीं जानेवारीच्या १–२ तारखेस शिर्डीस जाऊन आलों. ह्यावेळीं माझ्या यजमानांना बँकेंत महत्त्वाचीं कामें असल्यामुळें त्यांना रजा मिळणें शक्य नव्हतें. परंतु बाबांच्या कृपेनें त्यांना शिर्डीस जाण्यास चार दिवस रजा मिळाली. बाबांची लीला अगाध आहे.

नावलकर स्ट्रीट,
कुर्ला रोड, अंधेरी.

**सौ. शांताबाई खंडेराव नावलकर**

—: श्री साईनाथ सुप्रसन्न :—

आमचे परमपूज्य पितृदेव कै. श्री. बाळकृष्ण विश्वनाथ उर्फ बाळोसाहेब देव, बी. ए. सेवानिवृत्त. पहिल्या वर्गाचे मामलेदार, विश्वस्थ शिर्डी संस्थान कमिटी, व विश्वस्थ अण्णा चिंचणकर इस्टेट.

# देव यांचें अल्पचरित्र

आमचे परमपूज्य पितृदेव कै. श्री. बाळासाहेब देव. (ज्यांना आम्हीं घरीं 'काका' या नांवानें संबोधित होतों) हे पुण्यापासून २० मैलांवर असलेल्या पौंड या गांवीं आमच्या कुटुंबाच्या तेथील घरांत मार्गशीर्ष शु. ६ शके १७८८ या शुभदिनीं जन्मले. तो दिवस चंपाषष्ठीचा होता. आमचे वडील, हे आमचे पूज्य आजोबा कै. श्री. विश्वनाथ सदाशिव उर्फ नानासाहेब देव यांचें द्वितीय कुटुंब बाई लक्ष्मीबाई यांच्यापासून झालेले द्वितीय चिरंजीव होत. पहिले चिरंजीव जन्मानंतर ८–९ महिन्यांतच निवर्तले. त्यावेळचा प्रसंग असा कीं, कै. श्री. नानासाहेब हे पुण्याला गेले होते. तेथें त्यांना एक स्वप्न पडलें व स्वप्नांत त्या चिरंजीवांनीं येऊन सांगितलें कीं, 'मला सरकारचें तांतडीचें बोलावणें आल्याकारणानें मी घाईनें जात आहें. पण माझ्या मागोमाग, माझ्याइतकच उत्तम बालक जन्माला येईल, व तें बालक आपल्याजवळ कायम राहील. त्यापासून आपल्या घराण्याला सुख व संपत्ती लाभेल. हें स्वप्न पाहून कै. श्री. नानासाहेबांचें मन अत्यंत अस्वस्थ झालें व आपलें पुणें येथील काम तसेंच टाकून ते पुण्याहून पौंडला लगबगीनें परत आले परंतु ते जे पौंडला आले ते वरील चिरंजीव दिवंगत झाले आहेत हें बघण्याकरतांच आले; स्वप्नांतील दृष्टान्तावर विश्वास ठेवून कांहीं वेळ कालक्रमण केल्यानंतर थोडेच दिवसांत आमच्या परमपूज्य कै. पितृदेवांचा जन्म झाला. त्यांचें पाळण्यांतलें नांव 'रामचंद्र' असें ठेवण्यांत आलें पण सर्वजण 'बाळ' असें म्हणत असत म्हणून पुढें 'बाळकृष्ण' हें नांव प्रचलित झालें.

आमचें घराणें हें पूर्वीपासूनच प्रख्यात असें आहे. घराण्याबद्दल सर्वांना आदरच वाटत असे. कै. श्री. नानासाहेबांच्या अगोदरच्या सात पिढ्यांत एक एकच पुरुष होता म्हणचे त्यांना एकापेक्षां जास्त मुलें झालीं नव्हतीं. पण कै. श्री. नानासाहेबांच्या वेळेपासूनच परमेश्वरकृपेनें संततीची वाढ झाली. त्याचप्रमाणें आमच्या घराण्यामध्यें पहिल्यापासून गुरुसंगती व गुरुप्रसाद यांचा आशीर्वाद आहे. याबद्दलचा उल्लेख पुढें येईलच. कै. श्री. नानासाहेबांना खालील अपत्यें झालीं.

कै. बाबूराव

कै. हरी

कै. सदाशिव

कै. बाळकृष्ण

कै. हरी आबा. (राधाबाई) कै. गोविंद. कै. आऊताई ओझरकर. कै. मथूताई पंडीत. कै. सुंदराताई किराणे. कै. चंद्राताई ढवळे

कै. सखूबाई मोर्ले. द्वारकताई. कै. बाळकृष्ण. सदाशिव. गणेश

कै. चिंतामण. कै. विष्णू. कै. कृष्णा

जगन्नाथ राजा. रंगा. शरद् भास्कर वामन

कै. मथूताई
(कै. वामनराव पंडीत)

कै. शिवराम मोरेश्वर

आबु राजा कांता बाळ

कै. सुंदराताई
(कै. अण्णासाहेब किराणे)

महादेव लक्ष्मण गोविंद

सदाशिव
(अपर्णाबाई)

वसंत श्रीधर गंगाधर

गणेश
सौ. सुमनाबाई

श्रीकांत

कै. बाळकृष्ण
(जानकीबाई)

श्रीनिवास
सौ. कमलाबाई

माधव रमेश मीना. उषा

श्रीपाद
सौ. नलिनी

श्रीराम

वरीलप्रमाणें थोडक्यांत व जरुरी पुरता असा कै. नानासाहेबांच्या वंशविस्तार [illegible] वेल आहे.

( अपूर्ण )

श्री. बा. देव

---

# —: शिर्डी वृत्त :—

श्री. संपादक महाशय श्री साईलीला मासिक यांचे सेवेशीं.

मागें साईलीलेंत शिर्डी वृत्त प्रसिद्ध होत असे परंतु साईलीला बंद पडल्यामुळें तें वृत्त प्रसिद्ध करतां आलें नाहीं तरीं आतां हें साईलीला बंद पडल्यापासूनचें त्रोटक शिर्डीवृत्त आपणांकडे पाठवित आहे तें छापण्याची विनंति आहे.

या दोन वर्षांत शिरडी संस्थानमध्यें फारच सुधारणा झाली आहे.

समाधी मंदिरासमोरील पटांगणांत संस्थाननें दोन इमारती बांधल्या असून त्यापैकीं एक दोन मजली व दुसरी एक मजली असून दोन्हींत मिळून पंचवीस खोल्यांची सोय आहे शिवाय पांच खोल्या दुकानासाठीं काढलेल्या आहेत.

तिसरी इमारत समाधीमंदिराच्या दक्षिणेस असून तेथें पांच खोल्या आहेत शिवाय त्यांत प्रत्येक खोलींस स्वतंत्र असें स्वयंपाक-गृह आहे. त्यामुळें हातानें स्वयंपाक करणाऱ्या भक्तगणांची फारच सोय झाली आहे.

संस्थानांत भक्तांच्या सोयीसाठीं संस्थाननें हल्लीं आठ बाथरूप ( स्नानगृहें ) बांधल्या असून पूर्वीच्या चार संडासाजवळ आणखीन चार संडास बांधून काढले आहेत.

लेंडी बागेची सुधारणा हळूहळू होत असून बागेंत असलेल्या शामसुंदर घोड्याच्या समाधीवर श्री. वर्तक, बांद्रा, यांनीं घोड्याचा एक ब्रॉझचा पुतळा बसविला आहे. नंतर त्यावर संस्थाननें छत्री बांधून काढल्यामुळें घोड्याच्या समाधीची शोभा अवर्णनीय दिसत आहे. घोड्याच्या समाधीच्या शेजारींच पूर्वेच्या बाजूस संस्थाननें मोठी विहीर बांधली असून त्या विहिरीच्या पाण्याचा उपयोग सर्व बागेस होतो. संस्थाननें आणखीन् एक विहीर रस्त्याशेजारील संस्थानच्या जागेंत बांधली आहे.

पूर्वी शिरडी-संस्थानचें एकच ऑफीस होतें. परंतु काम फार वाढल्यामुळें मॅनेजर यांचें ऑफीस भोजनगृहापासून निराळें काढलें आहे. आतां मॅनेजर यांचें ऑफीस समाधी मंदिराच्या पुढील खोलींत आहे व भोजनगृहाचें ऑफीस दिक्षित वाड्यांत आहे.

पूर्वीपेक्षां भक्त लोकांची ये–जा फार वाढलेली आहे. रोजचे कार्यक्रम सर्व प्रकारें व्यवस्थित चाललेले आहेत.

आपला कृपाभिलाषि

**मो. त्र्यं. खडकतकर**

मॅनेजर श्री साई संस्थान.

# —: विनंति :—

ज्या कोणास धर्मकृत्य अगर देणगीदाखल पैसे पाठविण्याचे असतील त्यांनीं ते 'मॅनेजर, श्रीसाई संस्थान, पोष्टः—शिरडी. जिल्हाः—अहमदनगर. या पत्त्यावर मनिऑर्डरनें पाठवावेत. मनिऑर्डर कूपनवर आपला पत्ता लिहावा म्हणजे त्यांना पावती व प्रसाद बरोबर मिळूं शकेल. अन्यत्र पाठविल्यास संस्थान जबाबदार नाहीं.

श्रीसाईसत्‌चरित्र मराठी ( दाभोळकरकृत ) व इंग्लिश ( ना. वा. गुणाजी यांनीं मराठीचें भाषांतर केलेलें ) छापून तयार आहेत. त्यांची किंमत अनुक्रमें रु. ७ व रु. ४ आहे. ज्या कोणास तें पोष्टानें मागवायाचें असल्यास त्यांनीं खालील पत्त्यांवर मराठी साई चरित्राकरतां रु. ८ व इंग्लिश साई चरित्राकरतां रु. ४ आ. ८ ची मनिऑर्डरनें पाठविल्यास त्यांना रजिस्टर पोष्टानें साईचरित्र पाठण्वियांत येईल.

[ १ ] मॅनेजर श्री साई संस्थान शिरडी. पोष्टः-शिरडी. जि० अहमदनगर.

[ २ ] विनायक आप्पाजी वैद्य, खजिनदार. श्रीसाई संस्थान शिर्डी.

चांचडची चाळ. राममंदिराजवळ, वेसावा रोड. **अंधेरी.** B. S. D.

# शिरडी संस्थान कमिटी

## ( १९४६ ते १९४९ )


### संस्थानचे विश्वस्त

१ श्री. वसंतराव नारायण गोरक्षकर, मुंबई ( मॅनेजिंग ट्रस्टी )
२ श्री. रघुवीर भास्कर पुरंदरे ,,
३ श्री. नागेश आत्माराम सावंत ,,
४ श्री. बाजीराव तात्या पाटील शिरडी
५ श्री. दत्तात्रेय दामोदर रासने पुणें

### सभासद

६ श्री. गो. का. गाडगीळ, बॅरिस्टर, अध्यक्ष, मुंबई
७ श्री. विनायक अप्पाजी वैद्य, खजिनदार, मुंबई
८ डॉ. केशव भगवंत गव्हाणकर दु. खजिनदार, मुंबई ( संपादक श्री साईलीला त्रैमासिक )
९ श्री. पी. के. सावंत B. A. L. L. B. पार्लमेंटरी सेक्रेटरी सेक्रेटरीएट्, मुंबई.
१० श्री. मधुसूदन धोंडदेव कांबळी, आर्टिस्ट, मुंबई.

११ श्री. रामचंद्र दादा पाटील, शिर्डी.
१२ श्री. श्रीधर नारायण खारकर, ठाणा.
१३ श्री. विठोबा अण्णाप्पा कामत, मुंबई.
१४ श्री. श्रीपाद बाळकृष्ण देव B. A. ( Hon ) L. L- B.
सेक्रेटरी ठाणा.
१५ श्री. जी. व्ही. वाड दु. सेक्रेटरी, भुसावळ.

# विनंति

हा साईलीलेचा अंक सर्व भक्तमंडळ–वर्गणीदारांस पाठविण्यांत येत आहे. यापुढील अंक ज्यांना पाहिजे असेल त्यांनीं साईलीलेची वर्गणी १ एप्रिल १९४८ च्या आंत मॅनेजर श्रीसाई संस्थान, शिरडी—पोस्ट. अहमदनगर—जिल्हा. या पत्त्यावर पाठविण्याची कृपा करावी. वर्गणी मनिऑर्डरनें पाठवावी. अंक व्ही. पी. नें पाठविला जाणार नाहीं.

टपाल खर्चासह वार्षिक वर्गणी म. ऑ. आगाऊ रु. ३ आ. ४ पै ० मनिऑर्डर कुपनवर पत्ता लिहावा.

कोणास श्रीसाईनाथ महाराजांबद्दलचे, स्वतःचे अनुभव, धार्मिक लेख अगर निबंध साईलीलेंत प्रसिद्ध व्हावे अशी इच्छा असल्यास संपादक यांजकडे पाठवावेत.

संपादक
'साईलीला'

---

**श्रीसाईनाथ प्रसन्न**

# डिसेंबर १९४७ चें शिर्डी-वृत्त

चालू महिन्यांत श्रीचें दर्शनास नेहमींप्रमाणें भक्त आले होते, शिवाय नाताळचे सुट्टी मुळें जादा भक्त आलें होते.

## देणगी

श्री. अनंत बाबुराव साळवी, चित्रकार. हल्लीं मुक्काम शिर्डी. अमेरिकन् अरगन् चार सप्तकाची बाजाची पेटी. अर्पण.

श्री. डॉ. ए. टी. सुब्रह्मण्यम् रेल्वे हॉस्पिटल, N. S. Ry. मु. निझामाबाद. गलेफ रेशमी. रंग अस्मानी. तांबडी बॉर्डर, अर्पण.

श्री. सावळाराम नारायण स्वार, मु. बांदें ( सावंतवाडी ) नागपुरी उपरणे पान ( एक ) किनार तांबडी अर्पण.

श्री. बाबू मुदलीयार. म्हैसूर. चांदीची प्रतिमा व चांदीचा तुकडा, दोन्हीचे वजन ( २। रु. )

श्री. होरमसजी नवरोजी गोलवाला, कपूर बिल्डिंग, कार्नर रोड, ग्रँटरोड, मुंबई रेशमी डिझाइन कापड २×१ यार्ड, अर्पण.

श्री. एम. आर. नागराज, मु. निझामसागर, N. S. Ry. चांदीचे ५१ एकावन्न् पानाचें तोरण. वजन ३$\frac{3}{8}$ तोळे, अर्पण.

श्री. रामचंद्र नरहर चितळकर, दादर ( मुंबई ) चांदीचा लामणदिवा. चांदीचे साखळीसह वजन तोळे दहा अदमासे. अर्पण.

श्री. यशवंतराव सावंत, मु. अंधेरी, B. S. D., चांदीचें निरांजन वजन तोळे ५,$\frac{3}{16}$, अर्पण.

श्री. सुशिलाबाई मुदलीयार, पुणें. चांदीचें फुलपात्र. वजन तोळें ५॥=, अर्पण.

श्री. एस. बी. केशवय्या सब-रजिस्ट्रार पेनुकोंडा. धोतर पान एक ( ४ यार्ड. ) अर्पण.

दिवाणबहादूर एच. कृष्णमूर्ति, इन्स्पेक्टर जनरल–मद्रास. धोतर पान एक, काळी किनार, अर्पण.

श्री. जे. एम. निचाणी. मुंबई सफेत रंगाचा रेशमी कपडा २×१$\frac{1}{2}$ मधोमध मोराची नक्षी असलेला, अर्पण.

श्री. एन. आर. वडनेरे, जळगांव. ज़री किनार उपरणें ( पान ) अर्पण.

श्री. दत्तात्रय बळवंतराव राणे, मुंबई. रेशमी पिवळ्या रंगाचा जर बार्डर लावलेला गलेफ, अर्पण.

श्री. सी. मद्दैया, मु. द्रोणाचलम्. ४ चार वार सफेत कपडा अर्पण.

श्री. के. शिवम्मा, द्रोणाचलम्. दाभणकाठी लहान उपरणे २×१. अर्पण.

श्री. सी. ए. बोरे, मुंबई चंदन, ऊद, अगरबत्ती, कापूर वगैरे अर्पण.

श्री. ए. व्ही. पेट्रो, मुंबई. उदबत्ती पुडा एक, अर्पण.

श्री. जे. एम. निपाणी, मुंबई. चहा २ पौंड, साखर ३ पौंड, उदबत्ती पुडे ६, धुपाचे पुडे ६, अर्पण.

श्री. विनायक बळवंत घाटे, शिर्डी. शिर्डीमहात्म्य पुस्तक अर्पण.

श्री. बालमुकुंद पिळगांवकर, मुंबई. चंदन ठोकळा. अत्तर बाटली लहान, केशर चार आणे भार.

## धर्मकृत्य

अभिषेक, अर्चन, लघुरुद्र, पूजा, नैवेद्य, ब्राम्हण सुवासिण भोजन, अन्नदान,

वगैरे, धर्मकृत्य नेहमींप्रमाणें झाले. श्री. वि. कामत, मुंबई यांनी श्रीमंदिरांत श्रीसत्यनारायण पूजा केली.

## कीर्तन

संस्थान गवई यांची या महिन्यांत कार्तिक व. ११ श्रीज्ञानेश्वरमहाराज पुण्यतिथी, मार्गशीर्ष शु. ११ अशी ३ तीन कीर्तनें झालीं. श्री. दत्तात्रय पांडुरंग ऊर्फ मामा फडके यांचे श्री. दत्तजयंती ( जन्मोत्सव कीर्तन ) झालें. संस्थानतर्फें एक रुपया नारळ प्रसाद देणेंत आला.

## नवल विशेष

श्री. दत्तजयंतीप्रीत्यर्थ श्रींचे पालखीची गांवांतून मिरवणूक.

श्री. वामन वासुदेव गोखले-गवई ग्वालीयर यांनीं श्रीपुढें गायनाची हजेरी दिली. संस्थानतर्फें एक रुपया व नारळ देणेंत आला.

श्री. वे. मु. देविदास भट्ट फाटक व वे. मु. रामभाऊ फाटक यांनीं वेदमंत्राची हजेरी दिली. संस्थानतर्फें एक रुपया नारळ प्रसाद देणेंत आला.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम आहे.

आपला नम्र,
**विठ्ठल य. मराठे**

---

श्रीसाईनाथ प्रसन्न

# जानेवारी १९४८ चें शिर्डी-वृत्त

चालू महिन्यांत श्रींचे दर्शनास नेहमींप्रमाणें साईभक्त आले होते.

## देणगी

श्री. सौ. शांताबाई खंडेराव नवलकर, नवलकर स्ट्रीट मु. अंधेरी ( मुंबईजवळ ) पांढरी जर बॉर्डरचे लाल रंगाचें वस्त्र, दुसरें पिवळे रंगाचे पांढऱ्या जरीचें वस्त्र असें दोनहि अर्पण.

श्री. ए. एच. कृष्णचेट्टी, मु. कडूर, ( मद्रास ) व्यापारी. गलेफ आकाशी रंगाचा ( तलम ) बार्डर नक्षीची पिवळी रेशमी अर्पण. दुसरी चांदीचीं फुलपात्रें ( लहान ) पांच वजन ( पांचाचे २८ तोळे ) असे दोन वस्तु अर्पण.

श्री. दिनशा आदरजी सराफ, ताडदेव-मुंबई ( वायल ) कापड फिक्कट पिवळया रंगाचें लांबी, ३ वार, अर्पण. श्री. शिरीनबाई जालेकर कपाडिया विरार ( मुंबई ) कोटींग कापड ३ वार अर्पण.

श्री. भरुचा पारसी, साकोरी, निरांजनें २ पितळी अर्पण. श्री उपासनी आश्रम ( कन्याकुमारी ) साकोरी. रेशमी फिक्का हिरव्या रंगाचा कपडा अर्पण.

श्री. सुगतचंद लक्ष्मीनारायण आगरवाले मु. मालेगांव, जि. नाशिक, करवतकाठी गलेफ ब्रॉम रंगी सुती २१×५० इंच अर्पण.

श्री. म. मासुला मणी, धोबी टँक, श्रीराम बिल्डिंग, मुंबई नं २. चांदिची समई ( वजन १०१ तोळे ) तसेंच सिल्क रंग हिरवा तांबडी बॉर्डर गलेफ अर्पण.

श्री. किसन मुदलीयार पंचवटी–नाशिक. २॥ वार सुती सफेत कपडा अर्पण.

श्री. माणीक मुदलीयार, पंचवटी–नाशिक. २॥ वार कापड सुती सफेत अर्पण.

श्री. कुमार बालकिसन निलकंठ मुदलीयार, पंचवटी–नाशिक. ( दामोदर बाळा अमले यांचा वाडा, पंचवटी ) चांदीची श्रीसाईबाबांची प्रतिमा पत्र्यावरील अर्पण.

श्री. आनंदराव दादा चौगुले, अंधेरी (धूप डबा–एक मण अठ्ठावीस पौंडांचा) अर्पण.

श्री. मदैय्या ढोण, चांदिचा नाग वजन ½ तोळा अर्पण.

श्री. मंगेश गजानन देऊळकर, मुंबई. चंदन तुकडा ¼ शेर अर्पण.

श्री. विमलबाई त्रिपाठी, मुंबई. चांदीचे लहान डोळे २. चांदीच्या पादुका लाख भरलेल्या. डोळे किंमत '।' पादुका. किंमत १॥ रु. अर्पण.

## धर्मकृत्य

अभिषेक अर्चन, लघुरुद्रपूजा, आरती, नैवेद्य, ब्राह्मण सुवाशिण भोजन अन्नदान वगैरे नेहमींप्रमाणें झालें. श्रीमंदिरांत दोन भक्तांच्या श्रीसत्यनारायणपूजा झाल्या.

## कीर्तनें

संस्थान गवई यांची मार्गशीर्ष व॥ ११ व पौष शु. ११ अशीं दोन कीर्तनें झालीं. बाहेरगांवचे कीर्तनकार श्री. ह. भ. प. बाबाराव ( गाडगेबुवांचे शिष्य ) यांचें कीर्तन श्रीमंदिरासमोरील पटांगणांत झालें. संस्थानतर्फे एक रुपया. नारळप्रसाद देणेंत आला. तसेंच श्री. ह. भ. प. गोपिचंदबुवा बोरीकर यांचें श्रीमंदिरांत कीर्तन झालें. संस्थानतर्फे एक रुपया व नारळ प्रसाद देणेंत आला.

## नवल विशेष

श्री. बाबुराव देवळणकर, पुणें यांनीं श्रीपुढें सनई वाजवून हजेरी दिली. संस्थान-तर्फे एक रुपया, नारळ प्रसाद देणेंत आला.

श्री. चंद्रशेखरम् तंजावरम् ( मद्रास ) श्रीपुढें नकलांचा कांहीं हास्य करमणुकीचा कार्यक्रम करून दाखविला. संस्थानतर्फे एक रुपया. नारळ प्रसाद देणेंत आला.

संस्थानतर्फे महात्मा गांधी निधनामुळें ता. ३१।१।४८ रोजीं दुःख व्यक्त करण्यांत आलें.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम आहे.

आपला नम्र
**विठ्ठल य. मराठे**

---

# अमर आत्मा

आत्मास ना जन्म ना मरण । नाहीं तयासी मूळकारण ।।
अज नित्य शाश्वत पुराण । सहज निर्धारण दुर्गम ।।
ॐकार प्रतीक जें ब्रह्म । तेंच त्याचें स्वरूप परम ।।
आगमनिगमांसही दुर्गम । तें काय सुगम सर्वत्रां ।।

महात्मा गांधी हिंदुस्थानला–नव्हे जगाला सोडून गेले. सत्य, अहिंसा व शांतीचा दीप कलीनें ह्या कलीयुगांत आपले कलीचें–तेज निस्तेज होत आहे असें पाहून काळा-कडून मालवून टाकला. महात्मा गांधी गेले–नव्हे त्यांचें शरीर गेलें–त्यांच्या अमर आत्म्यानें जगांतील लहान–थोर, सज्जन–दुर्जन, हिन्दू–अहिन्दू यांचीं हृदय–कपाटें खोलून आंत प्रवेश केला व आपण एकाच ईश्वराचीं लेंकरें आहोंत हें जगास पटवून दिलें.

सबुरी, श्रद्धा व रामनाम ह्या त्रिपुटीच्या सहाय्यानें स्वतःच्या आत्म्याचा **आत्मविश्वास** संपादून जगाला आत्मोद्धाराचा मार्ग खुला केला व धर्माची ( सत्य ) ज्योत आपला अमोल असलेला देह बलिदान देऊन तेवत ठेविली.

महात्मा गांधी हे आधुनिक काळांतील संत होते. त्यांनीं काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर ह्यांना रामनामाच्या नांगरानें नांगरून आत्मसात केलें व दया, क्षमा,

शांतीचें शेत उगवून त्यांत खरी भक्ति, खरी सेवा व खऱ्या धर्माचें बीज पेरलें त्याची मशागत करणें प्रत्येक मानवाचें कर्तव्य आहे.

ईश्वर निराकार, निरामय, निर्लोभ आहे; आत्मा अचल, अदृश्य, अमर आहे. आत्मा-ईश्वर पंचमहाभूतात्मक देहांत प्रवेश करून सकार, सजीव, सत्य स्वरूप होतो; व पुढें मायेच्या भोंवऱ्यांत सांपडून फक्त तो स्वतःला विसरून जाऊन भवचक्रांत सांपडतो. महात्मा गांधींचा आत्मा सत्यांतून आला व सत्यांत परत गेला. मिठाचा कण सागरांतूनच येतो व सागराला मिळाल्यावर एकरूप होतो.

दुधापासून दही, ताक व तूप होतें पण पहिलें एकच दूध असतें, तद्वत आत्मा एक आहे व भिन्न भिन्न रूपें घेऊन तो जगांत गारुड्याचा खेळ करीत आहे. ईश्वराची अनंत, अमुप, अमोल रूपें दिसतात परंतु खरें पाहिलें असतां ती एकाच सत्यस्वरूप धर्माची आहेत. जोंपर्यंत स्वतःची स्वतःला ओळख पटली नाहीं तोंपर्यंत दुसऱ्याचीं सुखदुःखें आपणांस समजणार नाहींत.

महात्मा गांधी हे पूर्णस्वरूप होते व ते आतां प्रत्येकाच्या घरीं अमररूपानें वावरत आहेत. तरी त्यांचा आदेश सर्वांनीं आपल्या हृदयपटावर कोरून धैर्यानें आणि सत्यानें वागणें हें प्रत्येक मानवाचें आद्य कर्तव्य आहे.

ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ॥
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्ण मेवावशिष्यते ॥

**महात्मा गांधी अमर आहेत**

—झिलू बेहेरे

---

बंडू—बाबा, आई म्हणते देव भावाचा भूकेला.
बाबा—मग खरें आहे तें.
बंडू—बाबा, मग देवाचा काय भाव ?

—कुमारी तिलोत्तमा गव्हाणकर

# श्री. साईबाबा शिरडी संस्थानांत

## विक्रीकरितां असलेलीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १ | श्री साई सच्चरित्र [मराठी] | किं. रु. ७–०–० |
| २ | सच्चरित, [इंग्रजी] | ४–०–० |
| ३ | दासगणूकृत श्रीसाईनाथ स्तवनमंजरी | ०–२–० |
| ४ | ,, [अध्याय ४ था] | ०–८–० |
| ५ | सगुणोपासना | ०–३–० |
| ६ | प्रधानकृत पुस्तक [इंग्रजी] | १–४–० |

वरील पुस्तकांकरितां व बाबांचे विश्वासनीय निरनिराळ्या साईजच्या फोटो वगैरेकरितां खालील पत्त्यावर लिहावें.

म्यानेजर, **शिरडी संस्थान**, मु. शिरडी, पो. रहातें, जि. **अहमदनगर.**

श्री. वि. आ. वैद्य मु. चाचडची चाळ, वरसावा रोड, अंधेरी **मुंबई.**

श्री साईबाबा शिरडी संस्थान कमिटी तर्फे

संपादकः– **डॉ. के. भ. गव्हाणकर** यानी, काळाचौकी रोड, मुंबई १२ येथें प्रसिद्ध केलें.

मुद्रकः– **के. एन. साफळे**, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस ज्यूडेक्स बिल्डिंग, त्रिभुवन रोड, **मुंबई ४.**